# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी येथील स.नं.२०७ पै ते स.नं.२१८ पै मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १८ मी रूंद रस्त्यापासुन ते स.नं.२०५ पै मधील ६ मी रूंदीच्या रस्त्यास जोडणारा पुर्व-पश्चिम रस्ता स.नं.२०६ पै व सनं.२०७ पै. कच्च्या स्वरूपात जाणेयेणे करिता नागरिक वापर करीत आहेत. सदरचा रस्ता मनपाचे ताब्यात घेऊन विकसित केल्यास तेथील नागरिकांना दळणवळणाचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. तरी स.नं.२०७ पै व स.नं.२०६ पै विकासयोजनेव्यतिरिक्त पुर्व-पश्चिम रस्ता १२ मी करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करण्यास मा. इ. प्रभाग समितीने ठराव क्र.४, दि.०५।१०।२०१७ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. स.नं.२०६ व स.नं.२०७ पै मधून पुर्व-पश्चिम १२ मी रस्ता नकाशात दर्शविल्याप्रमाणे सदर ठरावास अनुसरून मौजे भोसरी येथील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये म्युनिसिपल रस्ता म्हणून घोषित करावयाचा आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांवर योग्य तो विचार करून म्युनिसिपल रस्ता घोषित करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकत/सूचना विचारात घेतल्या जाणार नाही.

स्थळ – पिंपरी, पुणे

दिनांक - ।११।२०१७

जाहिरात क्रमांक ९६५
दिनांक 22/11/17.

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८

(टिप: सदर सूचना व नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईट वरही उपलब्ध आहे.)